**<u>ठळक बातम्या</u>**

- २१ व्या शतकातील भारताकडे जग आशेनं पाहत असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- देशभरात जन औषधी जन चेतना सप्ताहाला सुरुवात

- उपराष्ट्रपती जगदीप धनखड आज एका दिवसाच्या मुंबई दौऱ्यावर

- राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रमा अंतर्गत महाराष्ट्रातल्या राज्यस्तरीय मेळाव्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते उद्घाटन

- आयसीसी करंडक अजिंक्यपद क्रिकेट स्पर्धेत आज ब गटातला शेवटचा सामना दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंडदरम्यान कराचीमधे होणार

**आणि**

- जम्मू-काश्मीर, उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशात हिमवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत

**<><><><><><>**

२१ व्या शतकातील भारताकडे जग आशेनं पाहत आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. ते आज नवी दिल्लीत भारत मंडपम इथं NXT परिषदेत बोलत होते. जगाच्या कानाकोपऱ्यातून लोक भारत समजून घेण्यासाठी इथं येत आहेत, असं प्रधानमंत्री म्हणाले. नुकत्याच झालेल्या महाकुंभ मेळ्याच्या व्यवस्थापनाची प्रधानमंत्र्यांनी प्रशंसा केली. साऱ्या जगाला याबद्दल भारताचं कौतुक वाटत असल्याचं त्यांनी सांगितलं. योग आणि आयुष उत्पादनं जागतिक पातळीवर पोहोचल्याबद्दल त्यांनी कौतुकोद्गार काढले. भारतात मोठ्या प्रमाणात

उत्पादन होत असून निर्यात वाढल्याचं प्रधानमंत्र्यांनी नमूद केलं. भारतातल्या अनेक सेवा आणि वस्तू जगभरात जात आहेत असं प्रधानमंत्री म्हणाले.

**होल्ड बाईट….प्रधानमंत्री**

**<><><><><><>**

कृषी क्षेत्राला आणखी लवचिक आणि समृद्ध करणं हा यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पाचा उद्देश असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. कृषी आणि ग्रामीण समृद्धी या विषयावरच्या अर्थसंकल्पोत्तर वेबिनारमध्ये ते बोलत होते. कृषिक्षेत्राला देशाच्या विकासाचं पहिलं इंजिन मानून सरकारनं शेतकऱ्यांना मानाचं स्थान दिलं आहे, असं मोदी यावेळी म्हणाले. कृषी क्षेत्राचा विकास आणि खेड्यांची समृद्धी या दोन महत्त्वपूर्ण ध्येयांच्या दिशेनं आपण सर्वजण एकत्र वाटचाल करत आहोत, असं त्यांनी सांगितलं. सर्वात कमी कृषी उत्पादन असलेल्या देशातल्या १०० जिल्ह्यांच्या विकासासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजना सरकारनं जाहीर केल्याचंही त्यांनी नमूद केलं.

**<><><><><><>**

देशभरात आजपासून जन औषधी जन चेतना सप्ताहाला सुरुवात  झाली. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याणमंत्री जे पी नड्डा यांनी आज नवी दिल्लीत प्रधान मंत्री जनऔषधी योजनेच्या रथाला आणि इतर वाहनांना हिरवा झेंडा दाखवून रवाना केलं. येत्या ७ मार्च रोजी जन औषधी दिवस साजरा केला जाणार असून त्यानिमित्त या आठवड्यात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. नागरिकांना वैद्यकीय सेवा पुरवणं हे केंद्र सरकारचं कर्तव्य आहे, तसंच सरकारच्या विविध योजनांचा लाभ सर्वांना मिळावा यासाठी नागरिकांनीही त्याबद्दल जागृती करावी, असं नड्डा यावेळी म्हणाले.

**<><><><><><>**

रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज अहमदाबाद रेल्वे स्थानकाला भेट देऊन तिथं सुरु असलेल्या पुनर्विकास कामाची पाहणी केली. अहमदाबाद रेल्वे स्थानकाचा विकास अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्यानं केला जात असून येत्या तीन - साडे तीन वर्षात हे काम पूर्ण होईल, असं वैष्णव यांनी सांगितलं. गुजरातच्या विकासासाठी केंद्र सरकार वचनबद्ध आहे, गुजरातमध्ये लवकरच रेल्वे मार्गाचं १०० टक्के विद्युतीकरण पूर्ण होईल, असं ते म्हणाले. यावर्षीच्या अर्थसंकल्पात गुजरातसाठी १७ हजार १५५ कोटी रुपयांची विक्रमी तरतूद केली आहे, असंही त्यांनी सांगितलं.

<><><><><><>

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मणिपूरमधल्या संरक्षण स्थितीचा आढावा घेण्यासाठी आज नवी दिल्लीत बैठक घेतली. मणिपूरचे राज्यपाल अजय कुमार भल्ला, गृह सचिव गोविंद मोहन, गुप्तवार्ता विभागाचे संचालक तपन कुमार देका आणि इतर उच्चपदस्थ अधिकारी या बैठकीत उपस्थित होते.

<><><><><><>

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आज एका दिवसाच्या मुंबई दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यादरम्यान ते के. पी. बी. हिंदुजा वाणिज्य महाविद्यालयाच्या अमृतमहोत्सवाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून सहभागी होतील.

<><><><><><>

राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रमा अंतर्गत राज्यस्तरीय मेळाव्याचं उद्घाटन पुण्यात आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते झालं. राज्यभरात जिल्हास्तरावरच्या ३५ तर तालुकास्तरावरच्या ३५५ शाळांमधे हा कार्यक्रम राबवण्यात येत आहे. या कार्यक्रमा अंतर्गत १८ वर्षे वयापर्यंतच्या मुला मुलींची मोफत आरोग्य तपासणी केली जाणार आहे. जन्मजात आजार आणि इतर आजारांवर मोफत उपचार तसंच संदर्भ सेवा आणि विनामूल्य शस्त्रक्रिया करण्यात

येणार आहे. बालकाचं आरोग्य हे देशाच्या दृष्टीनं महत्त्वाचं असतं. त्यामुळे सर्वांनी आपल्या बालकांची आरोग्य तपासणी करून घ्यावी, असं आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलं.

**<><><><><>**

विविध राज्यांच्या निवडणूक आयुक्तांची ३१वी परिषद आजपासून महाराष्ट्र – मध्यप्रदेश सीमाभागातल्या  पेंच राष्ट्रीय उद्यानात होत आहे. २२ राज्यांचे निवडणूक आयुक्त या परिषदेत भाग घेणार असून महाराष्ट्राचे निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांचा त्यात समावेश आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमधे आधुनिक तंत्रज्ञानाचा आणि अभिनव कल्पनांचा वापर करण्यासंबंधी या परिषदेत विविध सादरीकरणं होणार आहेत. परिषद ४ मार्चपर्यंत चालेल.

**<><><><><>**

आयसीसी करंडक अजिंक्यपद क्रिकेट स्पर्धेत आज ब गटातला शेवटचा सामना दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंडदरम्यान कराचीमधे होणार आहे. दुपारी अडीच वाजता खेळ सुरु होईल. इंग्लंडचा संघ आधीच स्पर्धेतून बाहैर पडला असला तरी आजच्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा २०७ पेक्षा जास्त धानांनी पराभव झाला तर अफगाणिस्तानची वर्णी उपांत्य फेरीत लागू शकते. काल लाहोर इथं झालेल्या ब गटाच्या सामन्यात ऑस्ट्रेलिया आणि अफगाणिस्तान काल सामना झाला. पावसाच्या व्यत्ययामुळं दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण मिळाला. ऑस्ट्रेलिया, भारत आणि न्यूझीलंड संघानं उपांत्य फेरीत आपलं स्थान निश्चित केलं आहे.

**<><><><><>**

उत्तराखंडमध्ये, चमोली जिल्ह्यातील माना गावाजवळ काल सकाळी हिमस्खलनात अडकलेल्या ४७ कामगारांना वाचवण्यात यश आलं आहे. उर्वरित ८ कामगारांना वाचवण्यासाठी आयटीबीपी, लष्कर, बीआरओ, राष्ट्रीय आणि राज्य

आपत्ती दलाची पथकं शोध मोहिमेत गुंतली आहेत. मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी घटनास्थळी जाण्यासाठी रवाना झाले आहेत.  प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी धामी यांच्याशी दूरध्वनीवरुन चर्चा केली आणि परिस्थितीचा आढावा घेतला. तसंच सर्वतोपरी मदत करण्याचं आश्वासन दिलं.

**<><><><><><>**

उत्तराखंड मध्ये रुद्रप्रयाग, उत्तरकाशी, बागेश्वर आणि पिथौरागढ इथं आज मोठ्या प्रमाणावर हिमस्खलन होईल असा इशारा डेहराडून इथल्या हवामान विभागानं जारी केला आहे. याठिकाणी दोन दिवसांपासून सुरु असलेल्या संततधार पावसामुळे अनेक मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत. चमोली जिल्ह्यात ४० हून अधिक गावांवर बर्फाची चादर पसरली असून बद्रीनाथ, हेमकुंड साहिब, जोशी मठसह इतर ठिकाणचं जनजीवन विस्कळीत झालं आहे.

जम्मू काश्मीर मध्ये अनेक ठिकाणी झालेलं भूस्खलन आणि दरडी कोसळण्याच्या  घटनांमुळे राष्ट्रीय महामार्गावरची वाहतूक ठप्प झाली आहे. याशिवाय हिमवृष्टी आणि खराब हवामानामुळे अनेक प्रमुख रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत.

हिमाचल प्रदेशातही लाहौल, स्पीति, चंबा, कुल्लू आणि किन्नौर इथं मोठी हिमवृष्टी झाली आहे. या भागात ट्रान्सफॉर्मर बंद पडल्यानं अनेक ठिकाणी वीजपुरवठा बंद आहे. सुमारे ५०० मार्ग बंद आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून सर्व शैक्षणिक संस्थांना सुट्टी देण्यात आली असून नागरिकांनी अनावश्यक प्रवास टाळावा, अशी सूचना प्रशासनानं दिली आहे.

बिहार मध्ये अचानक आलेल्या पावसानं हवामान बदललं असून ऊन आणि पावसाचा खेळ सुरु आहे. राजधानी दिल्लीत आज हलका पाऊस पडेल, असा अंदाज आहे.

**<><><><><><>**

हिमाचल प्रदेशची राजधानी सिमला इथं एका हॉटेल मध्ये लागलेल्या आगीत महाराष्ट्रातल्या एका पर्यटकाचा मृत्यु झाला, तर दोन जण जखमी झाले. हे सर्व सांगली जिल्ह्यातले रहिवासी असून सिमल्याला पर्यटनासाठी गेले होते. जखमींना तातडीनं रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

**//<><><><><><>//**